# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.06.2025** **वारःशनिवार**

---

1. अहमदाबादमधील अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला,
2. पंतप्रधानांची दुर्घटनास्थळी भेट; जखमींची केली विचारपूस,
3. नागपूरमध्ये हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना उभारणार,
4. यंदाचं विश्व मराठी संमेलन नाशिकमध्ये 26 ते 28 डिसेंबर दरम्यान होणार,
5. जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिका विजयाच्या उंबरठ्यावर, आणि
6. राज्याच्या बहुतांश भागात पावसाच्या जोरदार हजेरीमुळे बळीराजा पेरण्यांच्या तयारीत.

**विमान अपघात**

अहमदाबादमध्ये शुक्रवारी अपघातग्रस्त झालेल्या विमानाचा फ्लाइट डेटा रेकॉर्डर अर्थात ब्लॅक बॉक्स काल सापडला असून याद्वारे अपघातापूर्वीच्या परिस्थितीवर प्रकाश पडू शकेल, अशी अपेक्षा आहे. अपघाताच्या पार्श्वभूमीवर Genx इंजिन असलेल्या बोइंग 787 विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे निर्देश हवाई वाहतूक महासंचालकांनी एअर इंडियाला दिले आहेत.

मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू असून आतापर्यंत डीएनएचे सुमारे 200 नमुने गोळा करण्यात आले आले आहेत. सात मृतदेह नातवाईकांकडे सोपवण्यात आले आहेत. अपघातानंतर या भागातल्या काही स्थानिकांचा ठावठिकाणा लागत नसून त्यांचाही शोध घेतला जात आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊन विमान अपघातात जखमी झालेल्या प्रवाश्यांची भेट घेतली. अपघातातून बचावलेले एकमेव प्रवासी रमेश विश्वासकुमार यांचीही त्यांनी विचारपूस केली. तसंच दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबियांची त्यांनी भेट घेतली. त्यानंतर मोदी यांनी बैठक घेऊन बचाव कार्याचा आढावा घेतला.

अपघातग्रस्त भागामध्ये आपत्ती व्यवस्थापन आणि लष्कराच्या मदतीला सामान्य नागरिकही पुढे सरसावले आहेत. रक्तदान करण्यासाठी अनेकजण पुढे येत असून प्रवाशांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था केली जात आहे.

**योग परिषद**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर 'योग कनेक्ट' या जागतिक शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्ली इथं सुरुवात होत आहे. आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या या परिषदेची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही आहे. देश परदेशातील सुमारे एक हजार अभ्यासक या परिषदेत भाग घेणार आहेत. जगभरातल्या आंतरराष्ट्रीय योग संस्थांचे प्रतिनिधी दूरस्थ पद्धतीनं उपस्थित राहतील. अमेरिका, युनायटेड किंग्डम, दक्षिण कोरिया आणि बाहरीनमधील तज्ञही परिषदेत सहभागी होणार आहेत. 'आंतरराष्ट्रीय योग दिनाचा गेल्या दशकातील प्रभाव' या विषयावरचा अहवाल परिषदेच्या निमित्तानं प्रसिद्ध केला जाणार असून 'योगशिक्षण आणि योगाभ्यासाचा लाभ' या विषयावर सत्रं घेण्यात येणार आहेत.

**नड्डा**

नागपूरमधल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्समध्ये "वैद्यकीय उपचारांसंबंधी सर्वोत्तम पद्धती" या विषयावरील परिषदेला सुरवात झाली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं आयोजित केलेल्या या परिषदेला केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी संबोधित केलं. दोन दिवसांच्या या परिषदेत रुग्ण-केंद्रित काळजी, संचलन कार्यक्षमता,

डिजिटल परिवर्तन आणि शैक्षणिक उत्कृष्टता यावर लक्ष केंद्रित करून विविध एम्स संस्थांनी स्वीकारलेल्या अनुकरणीय पद्धती प्रदर्शित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. देशभरातल्या एम्स संस्था, 'प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजना' विभाग आणि संरक्षण मंत्रालय, या परिषदेत सहभागी झाले आहेत.

**<u>नागपूर- हेलिकॉप्टर उत्पादन</u>**

नागपूरमध्ये सुमारे 8 हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन कारखाना उभारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं केली. यासंदर्भात मॅक्स एरोस्पेस अँड एव्हिएशन आणि महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग यांच्यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरमधील संरक्षण उत्पादन क्षेत्राला यामुळे गती मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशी सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये सुमारे 8 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. हा करार भारताच्या 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला चालना देणारा टप्पा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**<u>रक्तदान</u>**

आज जागतिक रक्तदाता दिन आहे. त्याचं औचित्य साधून आकाशवाणी पुणे केंद्रातर्फे रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या सोमवारी, 16 जून रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 2.00 या वेळात आकाशवाणी पुणे केंद्राच्या सभागृहात हे शिबिर होणार आहे. तरी शिबिरात रक्तदान करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>मुंबई-रायझिंग</u>**

मुंबईला आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देण्याच्या उद्देशानं 'मुंबई रायझिंग' हा उपक्रम आयोजित केला जात आहे, त्या अंतर्गत पाच प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांचं केंद्र स्थापना करण्यासाठी इरादापत्र (LOIs) आज प्रदान केली जाणार आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसंच उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे देखील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय एज्युसिटीमुळे देशातल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार आहे. ही देशातली अशा प्रकारची पहिली आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे.

**<u>शाळा सुरू</u>**

विदर्भ वगळता राज्यातल्या सर्व विभागात येत्या सोमवारपासून पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत आहे. विदर्भात 25 जून रोजी शाळा सुरू होणार आहेत. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी 'शाळा प्रवेशोत्सवा'च्या माध्यमातून मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी, सनदी आणि शासकीय अधिकारी जवळच्या शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेला भेट देणार आहेत. मुलांची शाळांमधली संख्या आणि उपस्थिती वाढावी आणि त्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असून त्याचा आढावा घेतला जाणार आहे.

**<u>विश्व मराठी संमेलन-नाशिक</u>**

विश्व मराठी संमेलन या वर्षी नाशिक इथं 26 ते 28 डिसेंबर होणार आहे, अशी माहिती मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी काल नाशिकमध्ये दिली. विश्व मराठी संमेलनाच्या नियोजनासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वर्षाच्या सुरवातीला पुण्यात पार पडलेल्या विश्व मराठी संमेलनात झालेल्या पुस्तक आदान- प्रदान उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर नाशिक इथल्या संमेलनातही हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. मराठी साहित्याची माहिती उपलब्ध व्हावी म्हणून मराठी साहित्य संग्रहालय स्थापन करण्यात येणार असल्याची माहितीही सामंत यांनी दिली.

**<u>बसथांबे-सरनाईक</u>**

परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन दिवसापूर्वी एसटीच्या अधिकृत हॉटेल थांब्याला भेट देऊन तिथल्या गैरव्यवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर एसटी महामंडळानं एक परिपत्रक काढून संपूर्ण राज्यातल्या हॉटेल थांब्यांबाबत नवीन आचारसंहिता जारी केली आहे. या हॉटेल थांब्याची निवड करताना तिथली स्वच्छता, अन्नपदार्थ दर्जा आणि

बसेसची पार्किंग व्यवस्था यांचा प्राधान्याने विचार केला जाणार आहे. मार्ग तपासणी पथकाच्या माध्यमातून वेळोवेळी या हॉटेल थांब्याची तपासणी करण्याच्या सूचना देखील मध्यवर्ती कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी दिली.

**विद्यापीठ करार-सोलापूर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठानं मुंबईच्या भाभा अणुसंशोधन केंद्राच्या आकृती केंद्राशी सामंजस्य करार केला आहे. यामुळे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना भाभा अणुसंशोधन केंद्राने विकसित केलेल्या दोनशेहून अधिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना अणुसंशोधन केंद्रामध्ये प्रकल्प करण्याबरोबरच प्रशिक्षणही मिळणार आहे.

**कसोटी क्रिकेट**

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत लंडन इथं लॉर्ड्सवर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेचा संघ अजिंक्यपदाच्या जवळ पोचला आहे. तिसऱ्या दिवसाच्या खेळावर काल दक्षिण अफ्रिकेच्या संघाचं वर्चस्व दिसून आलं. स्पर्धेत अजिंक्य राहाण्यासाठी दक्षिण अफ्रिकेला 69 धावांची आवश्यकता असून, त्यांचे आठ खेळाडू शिल्लक आहेत. तिसऱ्या दिवसाअखेर दक्षिण अफ्रिकेनं दोन गडी बाद 213 धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियानं दोन डावांत 212 आणि 207 धावा केल्या आहेत.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात कालही जोरदार पाऊस झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाच्या सरी कोसळत असून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार पावसामुळे ओढे, नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. कणकवली तालुक्यात कळसुली इथं ओढ्यात वाहून गेल्यानं एकाचा मृत्यू झाल्याची माहिती आपत्ती विभागाकडून देण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातही पावसाचा जोर असून आज आणि उद्या दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. जालना शहरासह जिल्ह्यात काल दुपारी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यात सलग तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी खरिपातल्या कपाशी लागवडीसह पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे.

**हवामान**

कोकणात बहुतांश ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. येत्या 18 आणि 19 तारखेला कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार